प्रकाशन योग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात,

दिवाणी अपीलीय अधिकारिता

दिवाणी अपील क्र. ____________/२०२३

(एस. एल. पी. (सी) क्र. २१८७६/२०१७ मधून उदभवणारे)

श्री राम श्रीधर चिमुरकर____________अपीलकर्ता

विरूध्द

भारत सरकार आणि इतर _________________ उत्तरवादी

न्यायनिर्णय

नागरथ्ना जे.

अनुमती दिली

२. हे अपील मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ च्या न्यायनिर्णयाला आव्हान देते, ज्यामध्ये उत्तरवादींनी दाखल केलेली रिट याचिका क्रमांक २११०/२००३ ही मंजूर करण्यात आली होती परिणामी, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक १९ जुलै, २००२ रोजी पारित केलेला न्यायनिर्णय व आदेश, ज्याद्वारे अपीलकर्त्याने दाखल केलेला मूळ अर्ज हा मंजूर करण्यात आला होता, तो रद्द करण्यात आला आहे.

३. त्वरित अपील दाखल करण्यामागची संक्षिप्त वस्तुस्तिथी खालीलप्रमाणे आहे.

३.१ असे कि, श्रीधर चिमुरकर हे उत्तरवादी क्रमांक २ उप संचालक आणि कार्यालय प्रमुख राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय, क्षेत्रीय परिमंडळ कार्यालय, नागपूर यांच्या कार्यालयात अधीक्षक म्हणून कार्यरत होते आणि सन १९९३ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सन १९९४ मध्ये मूलबाळ नसताना त्यांचे निधन झाले. त्यांच्यामागे त्यांची पत्नी नामे माया मोटघरे ज्यांनी नंतर यातील अपीलकर्ता म्हणजेच श्री राम श्रीधर चिमुरकर यास स्वतःचा मुलगा म्हणून दिनांक ६ एप्रिल, १९९६ रोजी म्हणजेच श्रीधर चिमुरकर यांच्या मृत्यूनंतर जवळपास दोन वर्षानंतर दत्तक घेतले होते.

३.२ श्रीधर चिमुरकर यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी माया मोटघरे आणि अपीलकर्ता हे अपीलकर्त्याचे नैसर्गिक वडिल प्रकाश मोटघरे यांच्या मालकीच्या घराच्या एका भागात राहत होते. त्यानंतर, एप्रिल १९९८ मध्ये, माया मोटघरे यांनी चंद्र प्रकाश या विधुर व्यक्तीशी विवाह केला आणि त्यांच्यासोबत जनकपुरी, नवी दिल्ली येथे राहू लागल्या.

३.३ वरील पार्श्वभूमीवर, अपीलकर्त्याने दिनांक १८ जानेवारी, २००० रोजी लिहिलेल्या पत्राद्वारे मयत सरकारी कर्मचारी श्रीधर चिमुरकर यांच्या कुटुंबियांना देय असलेल्या कौटुंबिक निवृत्तीवेतनाचा दावा केला. अपीलकर्त्याने केलेला दावा हा उत्तरवादी यांचेकडून या कारणावरून फेटाळण्यात आला की, केंद्रिय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२ (ज्याचा उल्लेख यापुढे संक्षिप्ततेसाठी "कें.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम" असा

केला जाईल) च्या नियम ५४ (१४) (ब) अन्वेय सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर सरकारी कर्मचाऱ्याच्या विधवा पत्नीने दत्तक घेतलेले अपत्य हे निवृत्तीवेतन मिळण्यास हक्कदार राहणार नाही. प्रतिवादीने पारित केलेला निर्णय हा अपीलकर्त्यास दिनांक २३ फेब्रुवारी, २००० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आला.

३.४ अपीलकर्त्याच्या कौटुंबिक निवृत्तीवेतनाचा दावा नाकारण्याच्या उत्तरवादी निर्णयामुळे व्यथित होऊन अपीलकर्त्याने केंद्रिय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे ओ. ए. क्रं. २१६६/२००१ हा मूळ अर्ज दाखल केला आणि या मूळ अर्जाद्वारे, उत्तरवादीचा २३ फेब्रुवारी, २००० रोजीचा आदेश बेकायदेशीर आणि घटनाबाह्य असल्याचे नमूद करून, सदरचा आदेश रदद करण्याची विनंती केली. याव्यतिरिक्त, अपीलकर्ता हा मयत सरकारी कर्मचाऱ्याचा दत्तक पुत्र आहे आणि त्यामुळे त्याला कौटुंबिक निवृत्तीवेतन मिळण्याचा हक्क आहे, असे घोषित करण्याची विनंती करण्यात आली.

३.५ केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी १९ जुलै २००२ रोजी दिलेल्या आदेशान्वये अपीलकर्त्याने दाखल केलेला ओ. ए. क्र. २१६६/२००१ चा मंजूर केला आणि अपीलकर्त्याला मयत सरकारी कर्मचारी श्रीधर चिमुरकर यांचा दत्तक पुत्र मानून अपीलकर्त्याचा कौटुंबिक निवृत्तीवेतनाच्या दाव्याचा विचार करण्याचे निर्देश प्रतिवादींना दिले. न्यायाधिकरणाचे ठळक निष्कर्ष पुढीलप्रमाणे काढले जाऊ शकतात.

i) कें.ना.से. (निवृत्तीवेतन) नियमावलीतील नियम ५४ (१४) (बी) मध्ये सुरुवातीला सरकारी कर्मचाऱ्याच्या निवृत्तीनंतर जन्माला आलेल्या किंवा दत्तक घेतलेल्या मुलगा किंवा मुलींना कौटुंबिक निवृत्तीवेतनाच्या लाभातून वगळण्यात आले होते. मात्र, १९९० आणि १९९३ मध्ये उक्त नियमात सुधारणा करून निवृत्तीनंतर जन्माला आलेल्या किंवा दत्तक घेतलेल्या मुलांवरील कौटुंबिक निवृत्तीवेतन मागण्याचा प्रतिबंध काढून टाकण्यात आला.

असे कि वरील सुधारणांच्या पार्श्वभूमीवर प्रतिवादींचा दिनांक २३ फेब्रुवारी, २००० चा आदेश टिकणार नाही.

ii ) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६ च्या कलम ८ आणि १२ नुसार ('एच.ए.एम.ए.' कायदा संक्षिप्ततेसाठी) एखाद्या हिंदू पुरुषाची विधवा स्त्री आपल्या मयत पतीकडून तसे निर्देश / व्यक्त केलेली इच्छा असल्याशिवाय मुलगा किंवा मुलीला दत्तक घेण्यास सक्षम आहे. असे कि विधवा स्त्रीने घेतलेल्या दत्तकविधानाचा परिणाम असा होईल की दत्तक अपत्य हे तिच्या मृत पतीचेही अपत्य आहे असे मानले जाईल, विजयालक्ष्मम्मा वि. बी. टी. शंकर, (२००१) ४ एससीसी ५५८ (विजयलक्ष्मम्मा) नुसार.

iii) असे की माया मोटघरे यांनी अपीलकर्त्याला दत्तक घेतल्यामुळे त्यांचे मृत पती श्रीधर चिमुरकर यांनीही अपीलकर्त्याला दत्तक घेतले आहे. असे मानले जाईल.

३.६ न्यायाधिकरणाच्या न्यायनिर्णयाने आणि आदेशाने व्यथित झालेल्या यातील प्रतिवादींनी रिट याचिका क्र २११०/२०१३ मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल करून त्याला आव्हान दिले.

३.७ ३० नोव्हेंबर २०१५ चा आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका मंजूर केली आणि केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी १९ जुलै २००२ रोजी सदर दिलेला न्यायनिर्णय आणि आदेश फिरवला. त्यामुळे मूळ याचिकाकर्त्याचे हे अपील आहे.

३.८ पुढील कार्यवाही सुरु करण्यापूर्वी, अपीलकर्त्याने दाखल केलेली रिट याचिका मंजूर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या कारणमीमांसेचा सारांश खालील प्रमाणे काढणे उपयुक्त होईलः

i) असे की मयत सरकारी कर्मचारी यांनी यातील अपीलकर्त्याला कायदेशीररित्या दत्तक घेतले असते तर अपीलककर्ता कौटुंबिक निवृत्तीवेतन मिळण्याकरिता हक्कदार ठरू शकला असता, अशी परिस्थिती प्रस्तुत प्रकरणामध्ये नव्हती .

ii) असे की न्यायाधिकरणाने 'एच.ए.एम.ए.' कायदा १८५६ च्या कलम ८ आणि १२ जे सामान्यतः इतर गोष्टीबरोबर हिंदू विधवा स्त्रीच्या दत्तविधानाशी संबंधित आहे, त्यावर आवलंबून राहण्यात चूक केली होती.

iii) असे कि कें.ना.से. (निवृत्तीवेतन) नियमावलीचा नियम ५४ (१४) (बी) हा सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवा स्त्रीने दत्तक घेण्याशी संबंधित नाही .

४. आम्ही अपिलकर्ता यांच्या तर्फे विद्वान वकील श्रीमती के शारदा देवी आणि केंद्रा तर्फे विद्वान अतिरिक्त महाधिवक्ता श्रीमती माधवी गोराडिया दिवाण यांचे म्हणणे ऐकले आणि अभिलेखा वरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

सादर निवेदन

५. अपिलकर्ता यांच्या तर्फे विद्वान वकील श्रीमती के शारदा देवी यांनी सुरुवातीलाच असा युक्तिवाद केला की, उच्च न्यायालयाने हिंदू विधवेच्या दत्तक घेण्याच्या क्षमतेवरील कायद्याची दखल न घेता न्यायाधीकरणाच्या निष्कर्षात हस्तक्षेप करण्याची चूक केली आहे.

५.१ पुढे असा युक्तिवाद केला की, हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६ कायद्याच्या तरतुदींनुसार, हिंदू विधवा स्त्रीने दत्त विधान केल्यास तिच्या मृत पतीनेच दत्त विधान केल्याचे मानले जाईल आणि कायद्याच्या या तरतुदीनुसार उच्च न्यायालयाने न्यायाधिकरणाच्या निष्कर्षात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नव्हती. अशाप्रकारच्या मताला या न्यायालयाने विजयलक्ष्मम्मा या प्रकरणामध्ये पुष्टी दिली आहे, ज्यामधे असे घोषित करण्यात आले होते की, हिंदू विधवेने दत्त विधान केल्यास तिच्या पतीने देखील दत्त विधान केल्याचे मानले जाईल.

५.२ निवृत्तीनंतर जन्मलेली अथवा दत्तक घेतलेली मुले ज्यांनी कौटुंबिक निवृत्ती वेतनाची मागणी केली, त्यांच्या विरोधातील बंदी ही नंतरच्या कायद्यातील सुधारणेद्वारे दूर करण्यात आली हे म्हणणे मांडण्याकरिता,

कें.ना.से. (निवृत्तीवेतन) नियमांमधील नियम ५४ (१४) (ब) मधील तरतूद, जशी ती अगोदर अस्तित्वात होती, जी सन १९९० आणि १९९३ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांनंतर उपरोक्त तरतुदींच्या विरोधाभासी झाली, त्यावर भिस्त ठेवण्यात आली होती. सबब कौटुंबिक निवृत्तीवेतन देणे कामी "कुटुंब" या व्याख्येमध्ये सरकारी कर्मचाऱ्याच्या निवृत्तीनंतर कोणत्याही वेळी दत्तक घेतलेल्या मुलांचा, ज्यात सरकारी कर्मचाऱ्याच्या पत्नीने त्याच्या मृत्यूनंतर दत्तक घेतलेल्या मुलांचाही समावेश करणे गरजेचे आहे.

५.३ शास्त्रीय हिंदू कायद्यांतर्गत असलेल्या तरतुदींच्या विपरीत, हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६ च्या तरतुदींनुसार, हिंदू स्त्री फक्त आपल्या पतीच्या सांगण्यावरून किंवा त्याच्या परवानगीनेच नव्हे तर स्वतःच्या अधिकारात सुद्धा दत्तक घेण्यास पात्र आहे. पुढे या कायद्याच्या कलम १२ मध्ये अशी तरतूद आहे की, दत्तक घेतलेल्या मुलाचे तिच्या/त्याच्या जन्मदात्या कुटुंबाशी कोणतेही संबंध राहणार नाही आणि फक्त त्याच्या दत्तक कुटुंबाशीच संबंध राहतील. उपरोक्त प्रस्तावांच्या संयुक्त वाचनातून असे दिसून येते की, हिंदू विधवेने दत्त विधान केल्यास, अशाप्रकारे दत्तक घेतलेले मुल आणि तिचा मृत पती यांमध्ये निश्चित संबंध निर्माण होतील.

त्याच अनुषंगाने असे सादर करण्यात आले होते की, यातील अपिलकर्ता याचा संबंध फक्त त्याची दत्तक आई माया मोटघरे हिच्या सोबतच न राहता तिचा मृत पती श्रीधर चिमूरकर यांच्यासोबत देखील राहील. यास अधिक कारण की, तिने दत्तक दिनांक पर्यंत पुनर्विवाह केलेला नव्हता म्हणजेच अपिलकर्ता यांच्या दत्तक दिनांक च्या दिवसापर्यंत माया मोटघरे या श्रीधर चिमूरकर यांच्या विधवा होत्या आणि म्हणून अपिलकर्ता, श्रीधर चिमूरकर

यांचा सुद्धा दत्तक मुलगा होतील आणि या दत्त विधानाच्या परिणामांची गणना करणे आवश्यक राहील.

उपरोक्त प्रकथनासह, मा उच्च न्यायालयाचा अक्षेपित निकाल बाजूला ठेवून आणि न्यायाधिकरणाचा निकाल पुर्ववत करून सध्याच्या अपीलला परवानगी द्यावी अशी विनंती करण्यात आली.

६. याउलट, विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्रीमती माधवी गोराडिया दिवान, भारतीय संघराज्याच्या वतीने हजर राहून असे सादर केले की, अक्षेपित निकाल हा कायद्याच्या दोषरहित
मुल्यांकनावर आधारित आहे आणि या न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.

६.१. कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांच्या नियम ५४ (१४) (बी) मध्ये, अशा सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर सरकारी कर्मचाऱ्याच्या विधवेने दत्तक घेणे समाविष्ट नाही, असे सादर केले होते. त्यामुळे, अपीलकर्त्याला कौटुंबिक निवृत्ती वेतन देण्यासाठी सदर नियम लागू करता येणार नाही. कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांच्या नियम ५४ (१४) (बी) अंतर्गत प्रदान केल्यानुसार सरकारी कर्मचाऱ्याच्या संबंधात 'कुटुंब' ची व्याख्या, एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवेने दत्तक घेतलेल्या मुलाचा समावेश करण्याइतकी विस्तृत नाही.

६.२. एचएएमए कायदा, १९५६ च्या कलम ८ आणि १२ वर अपीलकर्त्यासाठी विद्वान वकिलांनी ठेवलेला विश्वास चुकीचा होता, असा युक्तिवाद करण्यात आला. तथापि, या तरतुदी सध्याच्या प्रकरणासाठी अप्रस्तुत आहेत. ज्या केवळ हिंदू विधवेच्या दत्तक घेण्याच्या क्षमतेच्या प्रश्नाशी संबंधित नाहीत, तर हिंदू विधवेने दत्तक घेतलेल्या मुलाच्या

हक्काच्या मुद्द्यांशी संबंधित आहेत. त्याच्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर मिळणा–या कौटुंबिक निवृतिवेतनाचा समावेश आहे.

६.३. मृत सरकारी कर्मचारी श्रीदर चिमुरकर यांच्या विधवा माया मोटघरे यांनी अपीलकर्त्याला दत्तक घेतल्याचा त्यांचा सेवेतून निवृत्तीच्या तारखेशी संबंध नाही, असा युक्तिवाद पुढे करण्यात आला. त्यामुळे अपीलकर्ता श्रीदर चिमुरकर यांचा दत्तक मुलगा या नात्याने कौटुंबिक निवृत्ती वेतनाचा दावा करू शकत नव्हता. उपरोक्त प्रतिवादांसह प्रतिवादींच्या वतीने विनंती करण्यात आली की सध्याचे अपील गुणवत्तेपासून वंचित असल्याने फेटाळण्यात यावे आणि उच्च न्यायालयाच्या अक्षेपित निकालाची पुष्टी करण्यात यावी.

विचारार्थ मुद्दे:

७. संबंधित पक्षांकारांच्यावतीने बाजू मांडणारे विद्वान वरिष्ठ वकील आणि सदर विद्वान वकिलांच्या निवेदनाच्या संदर्भात, विचार केल्यानंतर आमच्या विचारासाठी खालील मुद्दे उदभ्वतात.

i सरकारी कर्मचाऱ्याच्या विधवेने दत्तक घेतलेले मूल, सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर, कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांच्या नियम ५४ (१४) (बी) अंतर्गत 'कुटुंब' या व्याख्येच्या कक्षेत समाविष्ट केले जाईल का, आणि म्हणून उक्त नियमांनुसार देय असलेले कौटुंबिक निवृत्ती वेतन मिळण्यास पात्र आहे का+

ii काय आदेश?

कायदेशीर योजना:

८. पुढे जाण्यापूर्वी, एचएएमए कायदा, १९५६ आणि कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांच्या संबंधित तरतुदींचा संदर्भ घेणे उपयुक्त ठरेल.

८.१. एचएएमए कायदा, १९५६ हिंदूंमध्ये दत्तक घेणे आणि देखभाल करण्यासंबंधी कायदा संहिताबद्ध करण्याचा प्रयत्न करतो. कायद्याचे प्रकरण II हे दत्तक घेण्याशी संबंधित आहे आणि इतर गोष्टींबरोबरच, दत्तक घेण्याची पद्धत, दत्तक घेण्याच्या मार्गाने निर्माण केलेल्या कायदेशीर जबाबदाऱ्या आणि दत्तक घेतल्यानंतर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख आहे.

८.२ सदर कायद्याच्या कलम ५ मध्ये अशी तरतूद आहे की एखाद्या हिंदू व्यक्तीस कोणतेही दत्तविधान या कायद्याच्या तरतुदींनुसार असल्याखेरीज, करता येणार नाही आणि सदर कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेले कोणतेही दत्तविधान शून्य असेल आणि त्यामुळे दत्तक घराण्यात कोणतेही अधिकार त्याच्या किंवा तिच्या प्रित्यर्थ निर्माण होणार नाहीत तसेच कोणत्याही व्यक्तीचे तिच्या किंवा त्याच्या जनक घराण्यातील अधिकार नष्टही होणार नाहीत. पुढे कलम ६ मध्ये या कायद्याखालील विधीग्राह्य दत्तविधानाच्या आवश्यक बाबी नमूद केल्या आहेत. कलम ७ हे हिंदू पुरुषाच्या दत्तक घेण्याच्या क्षमतेविषयी आहे तर कलम ८ हे हिंदू स्त्रीच्या दत्तक घेण्याच्या क्षमतेसंबंधी आहे. कलम ८ हे सद्य प्रकरणाशी संबंधित आहे आणि त्यातील उपयुक्त उतारा खालील प्रमाणे आहे -

"८. हिंदू स्त्रीची दत्तक घेण्याची क्षमता. -- जी अविकल मनाची आहे आणि जी अज्ञान नाही अशा कोणत्याही हिंदू स्त्रीला पुत्र किंवा कन्या दत्तक घेण्याची क्षमता आहे. परंतु असे की, जर

तिला हयात पती असेल तर त्याची संमती असल्याखेरीज तिला पुत्र किंवा कन्या दत्तक घेता येणार नाही. मात्र त्या पतीने प्रपंचाचा संपूर्णपणे व कायमचा त्याग केला असेल किंवा तो हिंदू राहिलेला नसेल किंवा सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने तो विकल मनाचा असल्याचे घोषित केलेले असेल तर गोष्ट अलाहिदा.”

८.३ एचएएमए कायदा, १९५६ मधील कलम १२, जे सद्य प्रकरणाशी संबंधित आहे, त्यामध्ये दत्तविधानाचे परिणाम दिलेले आहेत, ज्यात असे नमूद केले आहे की, दत्तक अपत्य सर्व प्रयोजनांकरिता दत्तविधानाच्या दिनांकी व तेव्हापासून त्याच्या किंवा तिच्या दत्तक पित्याचे किंवा मातेचे अपत्य असल्याचे मानले जाईल आणि अशा दिनांकापासून त्या अपत्याचे त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्याशी असलेले सर्व बंध तुटलेले आहेत व त्यांची जागा दत्तविधानामुळे दत्तक कुटुंबात निर्माण झालेल्या बंधांनी घेतली आहे असे मानले जाईल. सदर तरतुदींचा उतारा खालीलप्रमाणे आहे -

"१२**.** दत्तविधानाचे परिणाम**. --** दत्तक अपत्य सर्व प्रयोजनांकरिता दत्तविधानाच्या दिनांकी व तेव्हापासून त्याच्या किंवा तिच्या दत्तक पित्याचे किंवा मातेचे अपत्य असल्याचे मानले जाईल आणि अशा दिनांकापासून त्या अपत्याचे त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्याशी असलेले सर्व बंध तुटलेले आहेत व त्यांची जागा दत्तविधानामुळे दत्तक कुटुंबात निर्माण झालेल्या बंधांनी घेतली आहे असे मानले जाईल. परंतु -- (क) ते अपत्य जर त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्यात राहिले

असते तर जिच्याशी विवाह करू शकले नसते अशा कोणत्याही व्यक्तीशी तो किंवा ती विवाह करू शकत नाही ;
(ख) दत्तक अपत्याच्या ठायी दत्तविधानापूर्वी निहित झाली होती अशी कोणतीही संपत्ती, अशा संपत्तीच्या मालकीशी संलग्न अशी कोणतीही आबंधने असल्यास, त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्यातील नातलगांचा निर्वाह चालवण्याचे आबंधन धरून - त्यांच्या अधीनतेने अशा व्यक्तीच्या ठायी निहित असण्याचे चालू राहील;
(ग) दत्तक अपत्य कोणत्याही व्यक्तीकडे दत्तविधानापूर्वी त्याच्या किंवा तिच्या ठायी निहित झाली असेल अशी कोणतीही संपदा त्या व्यक्तीपासून निर्निहित करू शकणार नाही.”

८.४ परंतु प्रस्तुत प्रकरण हे केवळ हिंदू विधवा स्त्रीच्या दत्तक घेण्याच्या क्षमतेच्या बाबीशी संबंधित नसून, त्यामध्ये मयत शासकीय कर्मचाऱ्याच्या विशिष्ट वर्गातील कायदेशीर वारसदारांना देय असलेल्या कौटुंबिक निवृत्तीवेतनासाठी, हिंदू विधवा स्त्रीने दत्तक घेतलेल्या अपत्याला हक्कदार ठरवण्याच्या बाबी अंतर्भूत आहेत. याबाबत केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२ चे वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेले संबंधित नियम विचारात घेणे आवश्यक आहे.

कें.ना.से. (निवृत्तीवेतन) नियमांमधील नियम ३ (१) (एफ) मध्ये ‘कौटुंबिक निवृत्तीवेतन’ या संज्ञेची व्याख्या खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

“कौटुंबिक निवृत्तीवेतन म्हणजे ‘कौटुंबिक निवृत्तीवेतन, १९६४’ च्या नियम ५४ अंतर्गत जे स्वीकार्य आहे ते, परंतु त्यात महागाई भत्ता समाविष्ट नाही”.

नियम ५४, हा इतर बाबींबरोबरच, देय असलेल्या कौटुंबिक निवृत्तीवेतनाची रक्कम आणि ती देण्यासाठीच्या प्रक्रियेशी संबंधित आहे. नियम ५४ (१४) (बी) जो सध्याच्या प्रकरणाशी संबंधित आहे, त्यात, नियम ५४ च्या हेतुकरीता 'कुटुंब' ह्या संज्ञेची खालील शब्दांमध्ये व्याख्या केली आहेः

(ख) सरकारी नोकराच्या संदर्भात 'कुटुंब' ह्या संज्ञेचा अर्थ -

१) पुरुष सरकारी नोकराच्या बाबतीत, त्याची पत्नी किंवा महिला सरकारी नोकराच्या बाबतीत, तिचा पती.

१-अ) न्यायिक कार्यवाहीनंतर विभक्त झालेली पत्नी किंवा पती- अशा प्रकारचे विभक्तीकरण हे व्यभिचार ह्या कारणास्तव मंजूर केलेले नसावे आणि ह्यात असलेल्या व्यक्तीला व्यभिचार करण्याच्या कृत्याकरिता दोषी ठरविलेले असू नये

२) अविवाहित मुलगा ज्याचे वय 25 वर्षे पूर्ण झालेले नाही आणि अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटित मुलगी, ज्यामध्ये कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा व मुलगी यांचा समावेश होतो

iii- अवलंबित पालक

iv सरकारी कर्मचाऱ्याची अवलंबित अपंग भावंडे (म्हणजेच भाऊ किंवा बहीण)

त्या प्राथमिक माहितीसह, आपण हिंदू विधवा महिलेने दत्तक घेतलेले मुल, कें.ना.से. (निवृत्तीवेतन) नियमांमधील नियम ५४ अंतर्गत देय कौटुंबिक निवृत्तीवेतन प्राप्त होण्यास हक्कदार आहे का, ह्या प्रश्नाचा विचार करू.

<u>विश्लेषण:</u>

९. एचएएमए (हिंदू दत्तक विधान आणि निर्वाह खर्च ) अधिनियम १९५६ मधील कलम ८ हे हिंदू महिलेच्या मुलगा किंवा मुलगी दत्तक घेण्याच्या क्षमतेशी संबंधित आहे. सदर तरतुद, अल्पवयीन किंवा मानसिकदृष्टया अस्वस्थ नसलेल्या हिंदू महिलेला, स्वतःच्या अधिकारांमध्ये, स्वतःसाठी म्हणून मुलगा किंवा मुलगी घेण्यास परवानगी देते. या तरतुदीनुसार, ज्या हिंदू महिलेचा पती हयात आहे, ती तिच्या पतीच्या स्पष्ट संमतीशिवाय दत्तक घेणार नाही. तथापि, हिंदू विधवा महिला, घटस्फोटित हिंदू महिला किंवा अशी हिंदू महिला, जिच्या पतीने, लग्नानंतर, अंतिमतः प्रपंचाचा त्याग केला आहे किंवा ज्याला सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायलयाने मनोवैकल्यग्रस्त असल्याचे घोषित केले आहे अशा महिलांच्या संदर्भात ही पूर्वअट लागू नाही.

९.१) म्हणून, एका विधवेसह, हिंदू महिलेला तिच्या स्वतःच्या अधिकारात, एक मुलगा किंवा मुलगी दत्तक घेण्याच्या तिच्या क्षमतेसंदर्भात एक निसंदिग्ध अशी स्पष्ट वैधानिक घोषणा अस्तित्वात आहे. त्यामुळे एखाद्या विधवेने किंवा ज्या विवाहित महिलेच्या पतीने संपूर्णपणे आणि शेवटी प्रपंचाचा त्याग केला आहे किंवा जिच्या पतीला तो मनोवैकल्यग्रस्त मनाचा असल्याचे घोषित केले आहे तिने दत्तक घेतलेल्या मुलाचे दत्तक कुटुंब काय असेल, असा प्रश्न निर्माण होईल. कायद्याच्या कलम १२ चा मजकूर या

संदर्भात मर्यादित दृष्टीकोन प्रदान करतो. तथापि, सावन राम विरुद्ध कलावंती, एआयआर १९६७ एससी १७६१ ह्या प्रकरणात दिलेल्या निकालानुसार, या न्यायालयाने, हे स्पष्ट केले आहे की, एखाद्या विधवेने दत्तक घेतल्यास, दत्तक घेतलेला मुलगा किंवा मुलगी विधवेच्या मृत पतीच्या कुटुंबाचा सदस्य मानली जाईल असे घोषित करून सदरचा पैलू स्पष्ट केला आहे.

९.२) पुढे, सीताबाई विरुद्ध रामचंद्र, एआयआर १९७० एससी ३४३, ह्या प्रकरणामध्ये या न्यायालयाने, या कायद्याच्या कलम १२ अंतर्गत सूचीबद्ध केल्यानुसार दत्तक घेतल्यामुळे होणाऱ्या परिणामांची नोंद घेतली आणि हिंदू विधवेने दत्तक घेतल्यामुळे होणाऱ्या परिणामांची खालीलप्रमाणे नोंद घेतली.

५. [.....] कलम १२ मधील मुख्य भागाचे आणि कलम ११ च्या उप-कलम (vi) चे वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की या कायद्यांतर्गत दत्तक घेतल्याचा परिणाम असा होतो की दत्तक दिलेल्या मुलाचे, त्याने किंवा तिने जन्म घेतलेल्या कुटुंबाशी असलेले सर्व संबंध तुटतात. सदर मूल ज्या कुटुंबात जन्माला आलेले असते त्या कुटुंबाशी असलेले त्याचे अथवा तिचे नाते संपुष्टात येते. त्याचप्रमाणे, दत्तक कुटुंबात दत्तक जाण्यामुळे निर्माण झालेले नातेसंबंध सादर (पूर्वीच्या) नाते संबंधांची जागा आपोआपच घेतात. त्यामुळे मूल दत्तक देण्याचा (कायदेशीर परिणाम) म्हणजे सदर मुलाला त्याच्या जन्मदात्या कुटुंबाकडून दत्तक घेतलेल्या कुटुंबाकडे हस्तांतरित करणे असा असणे आवश्यक आहे.

कलम ११ आणि १२ ची योजना अशी आहे की, एखाद्या विधवेने दत्तक घेण्याच्या बाबतीत, दत्तक घेतलेले मूल हे सदर विधवा ज्या कुटुंबाचा भाग

आहे त्या कुटुंबात सामील होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर दत्तक घेतलेले मूल हे सदर विधवेच्या मृत पतीशी पुत्रत्वाच्या नातेसंबंधाने जोडले जाते.

१०. हिंदू कायद्यांतर्गत दत्तक घेतल्याच्या परिणामांची दखल घेतल्यानंतर, या टप्प्यावर हे अधोरेखित करणे आवश्यक आहे की हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६ च्या सदर तरतुदी केवळ एखाद्या हिंदू विधवेने दत्तक घेतलेल्या मुलाचा अधिकार त्याच्या दत्तक कुटुंबाच्या तुलनेत निश्चित करतात. हिंदू विधवेच्या दत्तक पुत्राचे अधिकार आणि हक्क, दत्तक कुटुंबाच्या विरोधात हिंदू कायद्यात उपलब्ध असल्याप्रमाणे, अशा दत्तक पुत्राला सरकारविरुद्ध, विद्यमान निवृत्तीवेतन नियमांनुसार विशेषतः शासित असलेल्या प्रकरणांमध्ये स्वयंसिद्ध पणे उपलब्ध आहे असे ग्राह्य धरता येऊ शकत नाही. वर चर्चा केल्याप्रमाणे, हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६ च्या तरतुदी सामान्यतः हिंदू स्त्रीच्या मुलगा किंवा मुलगी दत्तक घेण्याच्या क्षमतेशी आणि अशा दत्तक घेतल्यानंतरच्या परिणामांशी संबंधित आहेत. या सदर तरतुदी, प्रस्तुत प्रकरणी, ज्यामध्ये हिंदू कायद्याअंतर्गत अपीलकर्त्यासारख्या दत्तक घेतलेल्या व्यक्तीच्या अधिकारांशी संबंधित नाही यास जास्त सहाय्यकारी होत नाही तर सदर कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांअंतर्गत त्याच्या अधिकार आणि हक्कांशी संबंधित असलेल्या प्रकरणांमध्ये सहाय्यकारी होतात. हिंदू कायद्यानुसार दत्तक घेतलेल्या मुलाच्या हक्कांमध्ये आणि त्याच्या कौटुंबिक निवृत्तीवेतन घेण्याच्या हक्कांमध्ये महत्वाचा फरक आहे, ज्यामुळे सरकारी तिजोरीवर भार पडतो.

त्यामुळे कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांमधील नियम ५४ (१४) (बी) नुसार अपीलकर्त्याचे अधिकार आणि हक्क निश्चित करणे आवश्यक आहे.

१०. १. नियम ५४, इतर बाबींबरोबरच, देय असलेल्या कौटुंबिक निवृत्तीवेतनाची रक्कम आणि ती देण्यासाठीच्या प्रक्रियेशी संबंधित आहे. नियम ५४ (१४) (बी) जो प्रस्तुत च्या प्रकरणाशी संबंधित आहे, त्यामध्ये नियम ५४ च्या हेतुकरिता 'कुटुंब' या संज्ञेची व्याख्या केली आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सरकारी कर्मचाऱ्याने कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा किंवा मुलगी सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर कौटुंबिक निवृत्तीवेतनाचा दावा करण्यास पात्र आहे आणि म्हणून, असा लाभ त्याला दिला जाणे भाग आहे. सरकारी कर्मचाऱ्याच्या विधवेने त्याला दत्तक घेतले असले तरी त्याला मयत सरकारी कर्मचाऱ्याचा दत्तक पुत्र मानण्यात आले पाहिजे आणि म्हणून त्यांना कुटुंबातील व्यक्तीचा लाभ मंजूर होतो.

११. कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांमधील नियम ५४ (१४) (बी) मध्ये जसा उल्लेख आहे त्याप्रमाणे या प्रकरणात, “सरकारी कर्मचाऱ्यांशी बाबतीत” या वाक्य प्रयोगाचा अर्थ लावण्याची आवश्यकता आहे.

प्रकरणातील या महत्वाच्या मुद्याचा अर्थ लावण्याकरिता म्हणजेच कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांमधील नियम ५४ (१४) (बी) मध्ये नमूद असल्याप्रमाणे, अपीलकर्त्याचा कौटुंबिक निवृत्ती वेतनाचा हक्क निश्चित करण्यात “सरकारी कर्मचाऱ्याच्या बाबतीत” या वाक्य प्रयोगाचा प्रभाव याकरिता “च्या संबंधात” या वाक्य प्रयोगाच्या अर्थासाठी डोयपॅक सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध भारत सरकार (१९८८) २ एससीसी

२९९, या खटल्यातील या न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ घेणे उपयुक्त ठरू शकते.

"या प्रकरणात, स्वदेशी कॉटन मिल्स कंपनी लिमिटेड (संपादन आणि हमी पत्रांचे हस्तांतरण) अधिनियम, १९८६ च्या संदर्भात “च्या बाबतीत” या वाक्य प्रयोगाचा अर्थ लावताना या न्यायालयाने असे ग्राह्य धरले आहे की खालील वाक्यांचा अर्थ सदर आहेः

५०. "च्या बाबतीत" "(तसेच “च्या संबंधी") ही अभिव्यक्ती खूप व्यापक आहे जी दुसऱ्या विषयाची पूर्व कल्पना करते. हे सर्वसमावेशक शब्द आहेत ज्यांना संदर्भानुसार दोन्ही म्हणजेच प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष महत्त्व असू शकते .... या संबंधाने पृष्ठ क्रमांक ६२० आणि ६२१ वर ७६ कॉर्पस जुरीस सेकन्डम चा संदर्भ दिला जाऊ शकतो जेथे असे नमूद केले आहे की “संबंध असणे” या संज्ञेची अशी व्याख्या केले आहे की “एकत्रित आणण्यासाठी किंवा च्या अनुषंगाने जोडण्यासाठी”. असे स्पष्टपणे नमूद केले आहे की “शी संबंधित” याला “च्या अनुषंगाने” आणि “च्या संबंधी” याच्याशी समतुल्य किंवा समानार्थी समजले आहे. “शी संबंधी” ही अभिव्यक्ती विस्ताराची अभिव्यक्ती असून अंकुचनाची नाही.

[माझ्याकडून भर]

११.१ कायद्यात “च्या बाबतीत” "या वाक्य प्रयोगाचा वापर एका व्यक्ती किंवा वस्तूला दुसऱ्या व्यक्ती किंवा वस्तूशी संबंध आणण्याच्या किंवा जोडण्याच्या दृष्टीने केला जातो. "अशा संघटना किंवा जोडणीचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूप संदर्भावर अवलंबून असते. कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांमधील नियम ५४ (१४) (बी) मध्ये “सरकारी कर्मचाऱ्यांच्या

बाबतीत" हा वाक्य प्रयोग असे दर्शवेल की, त्यातील प्रवर्गात सूचिबद्ध केलेल्या व्यक्ती जसे पत्नी, पती, न्यायिक दृष्ट्या विभक्त झालेली पत्नी किंवा पती, मुलगा किंवा अविवाहित मुलगी, ज्यांचे वय 25 वर्षे पूर्ण झाले नाही, दत्तक पुत्र किंवा मुलगी, इत्यादींना मयत सरकारी कर्मचाऱ्याशी जोडण्याचा प्रयत्न केला जातो.या संदर्भात अशा व्यक्तींचा मयत सरकारी कर्मचाऱ्यांशी दूरचा नव्हे तर थेट संबंध किंवा जोडले असणे आवश्यक आहे. सदर नियमांतर्गत असे आवश्यक आहे की, कुटुंबातील सदस्यांचा मयत सरकारी कर्मचाऱ्यांशी अतिशय जवळचा संबंध असावा आणि त्यांच्या हयातीत ते मयत सरकारी कर्मचाऱ्यावर अवलंबून असावे. ..............................सबब मयत सरकारी कर्मचाऱ्याच्या पत्नीने दत्तक घेतलेला मुलगा किंवा मुलगी, सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर, कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांमधील नियम ५४ (१४) (बी) अंतर्गत 'कुटुंब' च्या व्याख्येत समाविष्ट होऊ शकत नाही.

१२. या न्यायालयाच्या पूनामल विरुद्ध भारत सरकार, (१९८५) ३ एससीसी ३४५, या प्रकरणामधील निर्णयाचा संदर्भ देणेही योग्य ठरेल ज्यामध्ये या न्यायालयाने ज्या कारणासाठी 'कौटुंबिक निवृत्तीवेतन' मंजूर करण्यात आले आहे, ते खालील शब्दात अधोरेखित केले आहेः

सन १९५० साली कौटुंबिक निवृत्तीवेतनाची संकल्पना मांडण्यात आली. एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याचा सेवेत असताना अथवा सेवानिवृत्तीनंतर लगेचच मृत्यू होतो तेव्हा पारंपारिक भारतीय कुटुंबात मात्र कमावत्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर, त्याची विधवा पत्नी किंवा अल्पवयीन मुले केवळ

अनाथच होत नाहीत तर त्यांना अनेकदा दारिद्र्य आणि उपासमारीला सामोरे जावे लागत असे. पारंपारिक भाषेत सांगायचे झाल्यास विधवा पत्नी क्वचितच लाभदायक रोजगार मिळवण्याच्या स्थितीत होती. पतीच्या सहचर्यापासून वंचित राहिल्यामुळे आणि आर्थिकदृष्ट्या अनाथ झाल्यामुळे तिला सर्वात जास्त त्रास सहन करावा लागला. सामाजिक-आर्थिक न्यायाचा एक उपाय म्हणून, विधवा पत्नींना या संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि अल्पवयीन मुलांना सज्ञान होईपर्यंत त्यांना मदत करण्यासाठी कौटुंबिक निवृत्तीवेतन योजना तयार करण्यात आली होती. यातूनच कौटुंबिक निवृत्तीवेतन योजना तयार करण्याची अंतस्थ प्रेरणा मिळाली आणि ती वेळोवेळी व्यापक करण्यात आली. तथापि, सदर योजना व्यापक करण्यासाठी अट अशी होती की सरकारी कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत मृत्यू आणि सेवानिवृत्ती उपदानाच्या रकमेतून दोन महिन्यांच्या वेतनाइतकी रक्कम किंवा रक्कम रुपये ५०००/- यापैकी जे कमी असेल ते, अंशदान देण्याचे मान्य केलेले असावे. ज्या सरकारी कर्मचाऱ्यांनी ही अट स्वीकारली नाही, त्यांना कौटुंबिक निवृत्तीवेतन योजनेचा लाभ नाकारण्यात आला."

वर उद्धृत केलेल्या परिच्छेदातून हे स्पष्ट होते की, मयत सरकारी कर्मचाऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना काही मदत करण्यासाठी, कौटुंबिक निवृत्तीवेतन एक साधन म्हणून तयार करण्यात आले होते. सबब ज्या व्यक्ती सरकारी कर्मचार्यांच्या मृत्यूच्या वेळी सरकारी कर्मचाऱ्यावर अवलंबून नव्हत्या, अशा व्यक्तिंचा ‘कुटुंब’ या शब्दाच्या व्याख्येत समावेश करता येणार नाही.

१२.१. "नॉसितूर अ सॉसीस" (म्हणजेच एखाद्या अस्पष्ट शब्दाचा किंवा वाक्यांशाचा अर्थ त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या शब्दांवरून काढावा) या सिद्धांतसूत्रात वर्णन केलेल्या सिद्धांताचा अर्थ प्रस्तुत प्रकरणात लागू होऊ शकतो. या सिद्धांतसूत्राचा अन्वयार्थ असा काढला जाऊ शकतो कि एखाद्या वाक्यांशाचा अर्थ त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या शब्दांचा विचार करून घेतला पाहिजे. प्रस्तुत प्रकरणात कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमावलीच्या नियम ५४ (१४) (बी) अंतर्गत नमूद केलेले वारसदार हे मयत सरकारी कर्मचाऱ्याचे त्याच्यावर अवलंबून असणारे जवळचे नातेवाईक असतात. सबब सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूपूर्वी त्याच्यावर अवलंबून नसलेल्या व्यक्तिंना कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमावलीच्या नियम ५४ (१४) (बी) अंतर्गत कुटुंबाच्या व्याख्येत समाविष्ट करता येणार नाही.

१३. पुढे, आम्ही अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांच्या युक्तिवादाशी सहमत होऊ शकत नाही की जर कें.ना.से. (पेन्शन) नियमावलीच्या नियम ५४ (१४) (बी) मध्ये समाविष्ट असलेली बंदी, सेवानिवृत्तीनंतर जन्माला आलेल्या किंवा दत्तक घेतलेल्या मुलांविरुद्ध असल्यामुळे, कौटुंबिक निवृत्तीवेतन मागतानाच्या तरतुदीतील पुढील सुधारणांद्वारे काढून टाकण्यात आली आहे, तर सरकारी कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही वेळी दत्तक घेतलेल्या मुलांचा, त्याच्या मृत्यूनंतर सरकारी सेवकाच्या विधवेने दत्तक घेतलेल्या मुलांचा, सरकारी कर्मचाऱ्याच्या विधवा पत्नीने त्याच्या मृत्यूनंतर दत्तक घेतलेल्या मुलांचा कौटुंबिक निवृत्तीवेतन मंजूर करण्याच्या उद्देशाने 'कुटुंब' च्या व्याख्येत समावेश केला पाहिजे. परंतु अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांनी सुचवल्याप्रमाणे ही तरतूद विस्तृत असू शकत नाही. कौटुंबिक निवृत्तीवेतनाच्या लाभाची व्याप्ति सरकारी

कर्मचाऱ्यांनी त्यांच्या हयातीत कायदेशीररित्या दत्तक घेतलेल्या मुलगे किंवा मुलींपुरतीच मर्यादित असणे आवश्यक आहे. कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमांनुसार, 'कुटुंब निवृत्ती वेतन' च्या पात्रतेच्या विशिष्ट संदर्भात आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात 'कुटुंबा' ची व्याख्या संकुचित स्वरूपात नमूद केली आहे. सबब कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमावलीतील नियम ५४ (१४) (बी) (ii) मध्ये 'दत्तक' हा शब्द एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याने त्याच्या/तिच्या हयातीत दत्तक घेतल्यापुरता मर्यादित असावा आणि सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या / तिच्या जीवित जोडीदाराने दत्तक घेतलेल्या प्रकरणापर्यंत त्याचा विस्तार करता कामा नये. कारण या तरतुदीचा उद्देश हा त्याच्या / तिच्या मुलाला त्याच्या वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत आणि अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटित मुलीस त्याचप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्याने त्याच्या / तिच्या हयातीत असे दत्त विधान केले असल्यास, दत्तक पुत्रास अथवा अविवाहित दत्तक कन्येस मदत करणे हा आहे.

१४. पुढे, मयत सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाचा जन्म झाल्यास, त्या प्रकरणाचा सरकारी कर्मचाऱ्याच्या विधवेने, त्याच्या मृत्यूनंतर दत्तक घेतलेले मुल या प्रकरणाशी विरोधाभास असावा. वारसांची पूर्वीची श्रेणी "कुटुंब" या शब्दाच्या व्याख्येत समाविष्ट आहे कारण असे मुल हे मयत सरकारी कर्मचाऱ्याचे मरणोत्तर मूल असेल. अशा मरणोत्तर मुलाचा हक्क हा सरकारी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर हयात असलेल्या जोडीदाराने दत्तक घेतलेल्या मुलापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. याचे कारण फार दूर नाही. याचे कारण की, मरणोत्तर मुलाच्या विरुद्ध, मयत सरकारी कर्मचाऱ्याचा,

त्याच्या मृत्यूनंतर दत्तक घेण्यात आलेला मुलाशी कोणताही संबंध नसावा. सबब, सरकारी कर्मचाऱ्याच्या संदर्भात 'कुटुंब' या शब्दाच्या व्याख्येचा अर्थ म्हणजे "कुटुंब" या शब्दाच्या नावाखाली येणाऱ्या व्यक्तीच्या विविध श्रेणी आणि सरकारी कर्मचाऱ्याशी त्याच्या हयातीत कौटुंबिक संबंध असणाऱ्या सर्व व्यक्ती. इतर कोणत्याही व्याख्येमुळे कौटुंबिक निवृत्तीवेतन देण्याच्या बाबतीत तरतुदीचा गैरवापर होऊ शकतो.

१५. असेही दिसून आले आहे की, विजयलक्ष्मम्मा प्रकरणातील या न्यायालयाचा निर्णयामुळे अपीलकर्त्याच्या प्रकरणाला मदत होणार नाही. सदर प्रकरण सध्याच्या प्रकरणातील तथ्यांना लागू होत नाही कारण सदर प्रकरण हे विधवेचा दत्तक घेण्याचा हक्क आणि दत्तक घेतलेल्या मुलाचा वारसा हक्क याच्याशी संबंधित आहे. सध्याचे प्रकरण केवळ कें.ना.से. (निवृत्ती वेतन) नियमामधील "कुटुंब" या शब्दांच्या व्याख्येशी संबंधित आहे. सदर व्याख्या निर्बंधात्मक आणि विशिष्ट आहे आणि हिंदू कायदा किंवा इतर वैयक्तिक कायद्यांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे सर्व वारसदारांना त्याच्या व्याप्तीत समाविष्ट करण्यासाठी वाढवली जाऊ शकत नाही. हे सर्वसामान्य आहे की, कायद्यातील एखाद्या शब्दाचा अर्थ लावताना, त्या शब्दाला किंवा संकल्पनेला दुसऱ्या कायद्यामध्ये असलेला अर्थ लावताना सावधगिरी बाळगली पाहिजे.

१६. यात वर दिलेली कारणे विचारात घेता, सध्याचे अपील फेटाळले जाण्यास पात्र आहे आणि त्यानुसार ते फेटाळण्यात आले आहे. उच्च न्यायालय, अधिकारिता, मुंबई, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५, चा न्यायनिर्णय कायम करण्यात आला आहे.

पक्षकारांनी आपापला खर्च सोसावा.

...................... न्या.

(के. एम. जोसेफ)

...................... न्या.

(बी. व्ही.नागरथ्ना)

नवी दिल्ली;

१७ जानेवारी, २०२३

**नकार**

या न्याय निर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x–x–x–x